# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१) ५२०५ (१०-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांबाबत शासन गंभीर नसल्याने उच्च न्यायालयाने अलिकडे नाराजी व्यक्त केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्येष्ठांच्या समस्यांसाठी लवाद स्थापन करणे देखरीखीसाठी अधिकारी नेमणे तसेच ज्येष्ठांसाठीच्या योजनांची प्रसिध्दी न होण्यामागील काय कारणे आहेत,
(३) असल्यास, राज्यातील वृध्दाश्रमामध्ये व इतरत्र राहणा-या ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न सोडविण्याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-१०-२०१७) :** (१) होय.
(२) ज्येष्ठ नागरिकांच्या परिपोषण / निर्वाह भत्यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर प्रत्येक विभागासाठी न्यायाधिकरण स्थापन करण्यात आले असून त्यामध्ये पीठासिन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी (महसूल) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यांचे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांना निर्वाह अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार ज्येष्ठ नागरिक धोरणाची माहिती सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचण्यासाठी विविध वर्तमानपत्रामध्ये व बस स्थानकांवर जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

### राज्यात वृध्दांमध्ये महिलांची संख्या जास्त असल्याबाबत

**(२) १४७४४ (१०-०४-२०१५). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) महाराष्ट्र राज्यात एका खाजगी सर्वेक्षणात वृध्दांची संख्या राष्ट्रीय सरासरी पेक्षा जास्त झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वृध्दांमध्ये महिलांची संख्या ही पुरुषांपेक्षा जास्त असल्याची बाब ही समोर आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, एकाकी जीवन जगत असलेल्या वृद्धांकरिता शासनाने कोणती धोरणात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-१०-२०१७) :** (१) व (२) अशा प्रकारचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.
(३) सामाजिक न्याय विभागामार्फत ज्येष्ठ नागरिकांकरिता सर्वसाधारण वृध्दाश्रम, मातोश्री वृध्दाश्रम, ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र देणे, ज्येष्ठ नागरिकांना एस.टी. भाड्यात ५०% सवलत, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना व इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना या योजना राबविण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्हा देखरेख सहकारी संस्थेअंतर्गत येणाऱ्या सेवानिवृत्त गट सचिवांचे ग्रॅज्युटी, व्याजाची उपदान रक्कम, थकीत असल्याबाबत**

**(३) २०१९५ (२१-०८-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हा देखरेख सहकारी संस्थेअंतर्गत येणाऱ्या सुमारे १५० सेवानिवृत्त गट सचिवांचे ग्रॅज्युटी, व्याजाची उपदान रक्कम, थकीत पगार व इतर भत्ते यापोटी सुमारे २५० कोटी रुपये थकीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औद्योगिक न्यायालय, पुणे यांच्या निवडयानुसार वेतनश्रेणी निश्चित करुन फरकासह रक्कम अदा करणे, निवृत्ताचे थकीत पगार, उपदान रक्कम व त्यावरील व्याज व इतर देय रक्कमा मागील १४ वर्षापासून थकीत असल्याने जिल्हा निवृत्त गटसचिव, परभणीच्या वतीने मागील ९ वर्षाहून अधिक कालावधीपासून मा.सहकारमंत्री, सहकार आयुक्त, पुणे, प्रधान सचिव, सहकार व पणन व वस्त्रोद्योग विभाग आदीकडे लेखी निवेदनाद्वारे मागणीही केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू निवृत्त गट सचिवांना देय असलेली रक्कम अदा करण्यात विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू निवृत्त गट सचिवांना ग्रॅज्युटी, व्याजाची उपदान रक्कम, थकीत पगार व इतर भत्ते यापोटी थकीत असलेली सुमारे २५० कोटी संबंधितांना त्वरित अदा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०१-२०१८) :** (१) नाही. काही गटसचिवांचे सेवाकाळाप्रमाणे देय असलेल्या वेतनवाढ फरकाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(२) व (३) मा.औद्योगिक न्यायालय, पुणे यांच्या दि.२३/११/१९९८ च्या निवाड्यानुसार गटसचिवांची वेतनश्रेणी लागू केलेली असून, सन १९९८ पूर्वीच्या सेवाकाळानुसार २, ४ व ६, वेतनवाढी यांचा त्यामध्ये समावेश केला नसल्यामुळे वेतनश्रेणी लागू केलेल्या सचिवांपैकी ३२ सेवानिवृत्त सचिवांनी मा.कामगार न्यायालय, नांदेड येथे प्रकरण दाखल केले होते. मा.कामगार न्यायालयाने संबंधित सचिवांच्या बाजूने निकाल दिलेला होता. परंतु सदर निकालामध्ये संबंधितांना द्यावयाच्या रक्कमा निश्चित करण्यात आल्या नसल्यामुळे जिल्हा उपनिबंधक, परभणी यांच्या कार्यालयाकडून रक्कमा अदा करण्यात आलेल्या नव्हत्या. त्यामुळे संबंधित सचिवांनी मा.दिवाणी न्यायाधीश व.स्तर परभणी येथे मा.कामगार न्यायालय, नांदेड यांचे निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत अपील दाखल केले आहे. सदर दाखल अपीलानुसार मा.न्यायालयाने संबंधित सचिवांच्या देय रक्कमा निश्चित करण्यासाठी जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था वर्ग-१, परभणी यांची नेमणूक करून अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे. सदर निश्चित होणाऱ्या रक्कमेनुसार व मा.दिवाणी न्यायालय व.स्तर, परभणी यांचे निर्देशानुसार रक्कमा अदा करण्यात येतील.

(४) न्यायप्रविष्ट बाबीमध्ये मा.न्यायालयाच्या आदेशानुसार आणि निधी उपलब्धतेनुसार रक्कमा अदा करण्यात येतील. तसेच जिल्हा उपनिबंधक, परभणी यांच्या कार्यालयाकडून यापूर्वी सेवानिवृत्त सचिवांचे उपदान व थकीत पगारापोटी रू.७८.७६ लाख रक्कमेची मागणी जिल्हा बँकेकडे केलेली आहे. परंतु रक्कम अद्याप प्राप्त झालेली नाही.

(५) सदर बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे तसेच जिल्हा बँकेकडे निधीची कमतरता असल्यामुळे विलंब होत आहे.

---

## पंढरपूर (ता.जि.सोलापूर) येथील रमाई घरकुल योजनेतील १५२ कुटूंबियांना दुसऱ्या हप्त्याचा धनादेश मिळाला नसल्याबाबत

**(४) ५८२५६ (२०-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर ता.जि.सोलापूर येथील रमाई घरकुल योजनेतील १५२ कुटूंबियांना दुसऱ्या हप्त्याच्या धनादेश न दिल्यामुळे तिर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगरसेवकांनी सभात्याग केला असल्याने माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेकरिता ४१२ लोकांचे प्रस्ताव सादर करण्यात आले, त्यापैकी ३०० लोकांना रितसर घरकुलांचा निधी मिळून पुनर्वसन झाले उर्वरित १५१ कुटूंबियांना पहिल्या हप्त्याचा धनादेश देण्यात आला असून दुसरा हप्ता देताना प्रशासनाने हा हप्ता थांबविल्याने लाभार्थ्यांची गैरसोय होत आहे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०१-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) रमाई घरकुल योजनेकरिता पंढरपूर नगरपालिकेने ४१२ घरकुलांचे प्रस्ताव मंजूर केले, त्यापैकी ३९५ लाभार्थ्यांना पहिला हप्ता देण्यात आला आहे. उर्वरित १७ लाभार्थ्यांपैकी एका लाभार्थ्यास सरकारी नोकरी लागणे, एका लाभार्थ्यांने घरकुलाची विक्री करणे व १५ लाभार्थ्यांनी कागदपत्राची पूर्तता न करणे या कारणामुळे पहिला हप्ता देण्यात आला नाही. परंतु पहिला हप्ता घेऊनही बांधकाम न करणे या कारणामुळे काहींना दुसरा हप्ता अदा करता आला नाही. तसेच घरकुलाची जागा बदलून बांधकाम करणे, घरकुलाची विक्री करणे, पती-पत्नीचे संयुक्त नावे घरकुलाची नोंद न करणे तसेच अपूर्ण बांधकामे, न्यायालयीन तक्रारी, शौचालय बांधकाम न करणे इत्यादि अडचणीमुळे काहींना तिसरा हप्ता अदा करता आलेला नाही.

वर नमूद ३९५ लाभार्थ्यांपैकी २८३ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता व १५ लाभार्थ्यांना तिसरा हप्ता देखील अदा केला आहे. तसेच उर्वरीत पात्र लाभार्थ्यांना नियमाप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करुन पुढील हप्ता अदा करण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

---

**समाजकल्याण विभागाच्या शिष्यवृत्ती वाटपातील त्रुटींबाबत**

**(५) ६४४८३ (२०-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागामार्फत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या सन २००८ ते २०१४ पर्यंतच्या शिष्यवृत्ती मंजुरी प्रस्तावात लेखा विभागाच्या पडताळणीत वेगवेगळ्या त्रुटी आढळून आल्याची माहिती दिनांक २९ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व दोषीविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) या प्रकरणी विशेष चौकशी पथकाने अंतिम चौकशी अहवाल दिनांक २६.०७.२०१७ रोजी शासनास सादर केला असून, सदर अहवालाची छाननी व पडताळणी आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचेमार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना थकित असलेली**
**शिष्यवृत्ती केंद्र शासनाने दिली नसल्याबाबत**

**(६) ६६२४८ (१०-०१-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासन अनुसूचित जाती, भटक्या जाती व जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या शिष्यवृत्तीसाठी दरवर्षी रु. २८०० कोटी अनुदान देते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाला केंद्र शासनाने मागील ४ वर्षापासूनचे सदरील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे एकूण १ हजार ८ कोटी रुपये अनुदान दिले नसल्याने साडे तेरा लाख विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती केंद्राकडे थकीत असल्याने राज्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त शिष्यवृत्ती मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०१-२०१८) :** (१) नाही, मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेंतर्गत होणाऱ्या अपेक्षित खर्चाच्या अनुषंगाने दरवर्षी केंद्र शासनाकडून मर्यादित प्रमाणात निधी प्राप्त होत आहे. यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी मागील वर्षातील खर्चाच्या मर्यादेत निधी उपलब्ध केला जातो. इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गाकरीता केंद्र शासनाकडून निधी मर्यादित स्वरुपात (Fund limited) निधी प्राप्त होतो.

(२), (३) व (४) केंद्र शासनाकडून मागील ४ वर्षापासून अनुसूचित जाती प्रवर्गासाठीचा रु.१७०३ कोटी व इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गासाठीचा रु.२६३४ कोटी इतका निधी राज्य शासनास प्राप्त होणे प्रलंबित आहे. सदर प्रलंबित निधीबाबत राज्य शासनाकडून वेळोवेळी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येतो.

वरील योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक निधी वेळीच प्राप्त होत नसला तरी, मागासवर्गीय विद्यार्थ्यी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नयेत म्हणून, या योजनांवरील खर्चाचा भार राज्य शासनाकडून उचलला जातो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्हयात शिष्यवृत्तीचे अनुदान मिळाले नसल्याने**
**पाच हजार प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(७) ६६७९१ (१०-०१-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात शिष्यवृत्तीचे अनुदान मिळाले नसून अद्यापी पाच हजार प्रकरणे प्रलंबित असल्याने याबाबत चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येईल अशी माहिती मा. सामाजिक न्याय मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ५ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले आहे,
(३) तसेच उक्त अनुदान वितरित न करण्याची कारणे काय आहेत व याप्रकरणात दोषी असलेल्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-१२-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) शिक्षण फी परीक्षा फी योजनांतर्गत विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यवसायिक महाविद्यालयातील अभ्यासक्रमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क शिक्षण शुल्क समितीकडून मंजूर करण्यास विलंब झाल्याने महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे अर्ज विलंबाने सादर केले, तथापि, पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना सदरहू योजनेचा लाभ देण्यास आवश्यक अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच सदरहू योजनेस पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समाजकल्याण विभागाच्या नविन आकृतीबंधात कर्मचाऱ्यांच्या जागा वाढविण्याबाबत**

**(८) ६७२९३ (१०-०१-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील समाजकल्याण विभागाच्या नव्या आकृतीबंधात १५ ते १६ हजार जात प्रमाणपत्रांची पडताळणी दोन लिपीक करणार असल्याचे बाब दिनांक १५ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सध्या १५ जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या असून त्यात सुधारणा करुन जिल्हास्तरावर एक याप्रमाणे २१ नव्या समित्यांची निर्मिती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या परिपत्रकात अध्यक्षांसह दोन लिपीक एक शिपाई व एक पोलीस शिपाई अशा पाच पदांचाच आकृतीबंध मान्य करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०७-२०१७) :** (१) नाही.
(२) होय.

(३) नाही. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांवर विविध ९ पदे निर्माण करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील समाजकल्याण अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दहा विविध मागण्यासाठी सुरु केलेले लेखणी बंद आंदोलन

**(९) ६८६०६ (१०-०१-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समाजकल्याण अधिकारी आणि कर्माचाऱ्यांनी दहा विविध मागण्यासाठी दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखणी बंद आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कोणकोणत्या मागण्या आहेत,

(३) त्यापैकी कोणकोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या व उर्वरित मागण्यांबाबत शासनाने काय निर्णय घेतला,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०१-२०१८) :** (१) होय.

(२) जादाची पदे मंजूर करण्यात यावी, रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी, प्रादेशिक उपायुक्त हे पद सह आयुक्त दर्जाचे करण्यात यावे, विभागातील कंत्राटी पदे नियमित करणे इत्यादी.

(३) समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने मा.मंत्री (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखाली अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रतिनिधींसोबत दि.१६.९.२०१६ रोजी बैठक आयोजीत करण्यात आलेली होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### औरंगाबाद जिल्हापरिषदेने मागासवर्गीय शालेय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा अपहार केल्याबाबत

**(१०) ७००४० (१०-०१-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हापरिषदेअंतर्गत सन २०११ ते सन २०१५ या कालावधीत शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे पैसे मिळाले नसल्याचे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या निदर्शनास माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, शिष्यवृत्तीच्या अपहाराचे स्वरूप काय आहे तसेच याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-१२-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) या प्रकरणी समाजकल्याण विभाग, औरंगाबाद यांनी पात्र लाभार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप तात्काळ करणेबाबत पत्राद्वारे सूचित केले. त्यानुसार प्रलंबित शिष्यवृत्ती गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती यांनी वाटप केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अग्नीहोत्री ग्रुप ऑफ इंन्स्टीटयुशन वर्धाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयाने शिष्यवृत्तीत केलेल्या गैरप्रकाराबाबत**

**(११) ७१२२० (१०-०१-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अग्नीहोत्री ग्रुप ऑफ इंन्स्टीट्युशन वर्धा अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयानी सन २०१० ते २०१६ पर्यंत ओ.बी.सी. विद्यार्थ्यांचे वर्गवारीत एस.सी. दाखवून शिष्यवृत्तीची रक्कम घेतल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाविद्यालयामध्ये प्रवेशासाठी लागणारे कागदपत्रे अपुर्ण व योग्य नसतांना विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती उचल करण्याकरिता प्रवेश देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त महाविद्यालयात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना शुल्क आकारण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले आहे, त्यानुसार संबंधितावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-१२-२०१७) :** (१) नाही.

(२) व (३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून शेतकऱ्यांना थेट कर्ज देणेबाबत

**(१२) ७३९६८ (२१-०४-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून शेतकऱ्यांना थेट कर्ज देण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास त्यासाठी सोलापूर, नांदेड, पुणे, नाशिक, धुळे, बीड, कोल्हापूर इत्यादी जिल्ह्यात राज्य बँकेच्या शाखा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-१२-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित या संस्थेतील गैरव्यवहारांबाबत

**(१३) ७७५७७ (०६-०५-२०१७). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित या संस्थेची मा. विभागीय सह निबंधक यांनी केलेल्या चौकशीत संस्थेने मागासवर्गीयांचा अनुशेष न भरणे, सीसीटीव्ही खरेदी, तिजोरी खरेदी, बंदुकधारी सुरक्षा रक्षकांची नेमणूक, इ, प्रकरणांमध्ये गैरव्यवहार केल्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार बँकेच्या दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२४-११-२०१७) :** (१) होय.

(२) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नाशिक या बँकेने केलेल्या अनियमित कामकाजाबाबतच्या चौकशी अहवालात १. सीसीटीव्ही खरेदी, २. न्यायालयीन खर्च (शासन अध्यादेशाविरुध्द), ३. बंदूकधारी सुरक्षा रक्षकांची नेमणूक, ४. बेकायदेशीर कर्मचारी नेमणूका यामध्ये बँकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे नमूद केले आहे.

(३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये दिनांक ०२/०१/२०१७ रोजीच्या आदेशान्वये कार्यवाही करून झालेल्या नुकसानीबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चितीची कारवाई सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने थकीत कर्जे असलेल्या सहकारी साखर कारखान्यांसह सूत गिरण्या व प्रक्रिया उद्योगांच्या लिलावाच्या नोटीसबाबत**

**(१४) ७७८६५ (२१-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने थकीत कर्जे असलेल्या सहकारी साखर कारखान्यांसह सूत गिरण्या व प्रक्रिया उद्योगाच्या लिलावाची नोटीस माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिध्द केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे हे सहकारी कारखाने आता खाजगीकरणाने चालणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहकारी चळवळीबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-१२-२०१७) :** (१) होय. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने थकीत कर्जाच्या वसुलीच्या दृष्टीने दिनांक ३०/१२/२०१६ च्या दैनिक लोकसत्ता व दैनिक फायनान्शिअल एक्सप्रेस या वृत्तपत्रात विक्रीसाठी जाहिरात प्रसिध्द करून निविदा मागविल्या होत्या.

(२) व (३) विक्री जाहिरातीस प्रतिसाद मिळाला नाही, सदर सहकारी साखर कारखाने भाडे तत्वावर चालविण्यास देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

---

**राज्यात प्रादेशिक पातळीवर दिव्यांगजनांसाठी मोफत भौतिक उपचार केंद्र सुरू करण्याबाबत**

**(१५) ८००५३ (०६-०५-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक पातळीवर दिव्यांगजनांसाठी मोफत भौतिक उपचार (फिजीओथेरेपी) केंद्र सुरु करण्याची मागणी दिनांक २३ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा अपंग पूनर्वसन केंद्र अधिकारी यांनी मा. आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालयाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-१२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रादेशिक पातळीवर दिव्यांगजनांसाठी मोफत भौतिक उपचार (फिजीओथेरेपी) केंद्र सुरु करण्याच्या मागणीबाबत जिल्हा अपंग पूनर्वसन अधिकारी, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, विरार, जि.पालघर यांच्या दि. २३ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये अपंग कल्याण आयुक्तालयास प्राप्त झालेला प्रस्ताव अपंग कल्याण आयुक्तालयामार्फत शासनास सादर करण्यात आलेला होता.

त्यानुसार सदर प्रस्तावास तत्वतः मान्यता दर्शविण्यात आली असून सदर प्रस्तावासंदर्भातील सर्व माहितीसह सविस्तर आराखडा शासनास सादर करण्याबाबत आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांना सुचित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सहाय्यक आयुक्त कार्यालयाच्या जागेबाबत**

**(१६) ८३०६९ (०६-०५-२०१७). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील स्वारगेट परिसरातील पीएमपीएमएलची मालकी असलेल्या इमारतीमध्ये अनेक वर्षापासून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सहाय्यक आयुक्त कार्यालय असून या कार्यालयातील सर्व ठीकाणी फाईल व कागदपत्रांचे गठ्ठे पसरले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कार्यालयात प्रामुख्याने जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शासनाकडून देण्यात येणारी शिष्यवृत्ती आणि मागास प्रवर्गासाठी शासनाने आखलेल्या विविध योजनांची पुर्तता करण्यात येते. या गाठठ्यांवर मोठ्या प्रमाणात धूळ असून येथे काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्याही या गाठठ्यांचा अडथळा होत असल्याचेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०१-२०१८) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण फी परीक्षा फी या दोन्ही योजनेचा व्याप इतर जिल्ह्यांच्या तुलनेत खुप प्रचंड आहे व इतर योजनांचे कामकाजही मोठ्या प्रमाणात आहे. सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, पुणे कार्यालयात सदर योजनांचे अभिलेखे जतन करून ठेवण्यासाठी स्वतंत्र अशी जागा उपलब्ध नसल्याने कार्यालयीन सर्व अभिलेखे गठ्ठे बांधून कार्यालयामध्ये ठेवण्यात आलेले आहेत.
(३) सामाजिक न्याय भवन इमारतीचे बांधकाम विश्रांतवाडी, येरवडा, पुणे-६ येथे अंतिम टप्प्यावर चालू असून सदर इमारतीमध्ये सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालय लवकरच स्थलांतरीत होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## हिंगोली जिल्हयात समाजकल्याण विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या शिष्यवृत्तीमध्ये अनियमितता झाली असल्याबाबत

**(१७) ८३८१७ (०६-०५-२०१७). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात समाजकल्याण विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये अनियमितता झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-१२-२०१७) :** (१) नाही.

(२) व (३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील १४ मतीमंद बालगृहांच्या जबाबदारीबाबत

**(१८) ८४८३० (१८-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बाल विकास विभागाच्या नियंत्रणाखाली असलेली राज्यातील १४ मतिमंद बालगृहे मंजूर कर्मचाऱ्यांसह दिनांक ३० मे, २०१२ रोजी वा त्यासुमारास सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागाने अद्याप सदर बालगृहांची जबाबदारी घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०६-०१-२०१८) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मराठा समाजाला आरक्षण मिळणेबाबत

**(१९) ८४८६८ (१८-०८-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल),**

**श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याचा मुद्दा नव्याने स्थापन झालेल्या इतर मागासवर्ग आयोगाकडे वर्ग करण्याचा निर्णय घेतल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रश्न मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असताना, राज्य शासनाने आयोग स्थापन करुन त्याकडे सोपविण्याचा निर्णय घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू मराठा आरक्षणाचा प्रश्न स्थापन केलेल्या आयोगातर्फे किती निश्चित कालावधीत सोडविण्यात येणार आहे व याकरीता राज्य शासनाने आयोगाशी समन्वय ठेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-१२-२०१७) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ४ मे,२०१७ रोजीच्या आदेशात मराठा समाजाचे मागासवर्गीय असल्याचे पुरावे तपासणीसाठी राज्य मागासवर्ग आयोगास पाठविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेण्याचे सूचित केले होते. त्याप्रमाणे राज्य शासनाने मराठा आरक्षणाबाबत संग्रहीत माहिती राज्य मागासवर्ग आयोगाकडे तपासणीसाठी पाठविली आहे.

(२) व (३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.४ मे, २०१७ रोजीच्या आदेशामध्ये मराठा आरक्षणाबाबत संग्रहीत माहिती राज्य मागासवर्ग आयोगाकडे पाठविण्याबाबत राज्य शासनाने निर्णय घ्यावा असे स्पष्ट केले होते.

त्याप्रमाणे शासनाने सदर प्रकरणातील शासनाची बाजू मांडणाऱ्या जेष्ठ विधीज्ञांचा व विशेष समुपदेशिंचा सल्ला घेऊन मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण स्पष्ट करणे ऐतिहासिक पुरावे, संदर्भ इत्यादी सर्व दस्तऐवज तपासून स्वयंस्पष्ट अहवाल शासनास लवकरात लवकर सादर करण्याबाबत शासन पत्र दि.३०/०६/२०१७ अन्वये राज्य मागासवर्ग आयोगास कळविण्यात आले आहे.

सद्यस्थितीत सदर बाब ही न्यायप्रविष्ट आहे. याबाबत राज्य मागासवर्ग आयोगाचा स्वयंस्पष्ट अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर यथोचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील तीन हजार एकर शेती सावका-यांच्या ताब्यात असल्याबाबत**

**(२०) ८५०२० (०६-०९-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने शेतकऱ्यांकडे असलेले सावकारांचे कर्ज माफ केले असले तरीही शेतकऱ्यांची अवैध सावकारीतून सुटका झाली नसून विदर्भातील तीन हजार एकर शेतीवर अवैध सावकाराचे कर्ज आहे व आता सावकार दामदुप्पट रक्कम मागत असल्याची बाब दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुडाणा (ता.महागाव, जि.यवतमाळ) येथील प्रकाश भिक्कू जाधव या दिंव्यांग शेतकऱ्यांच्या वडीलांनी सावकाराकडे पाच एकर शेती एक लाख रूपये कर्ज घेऊन गहाण ठेवली व सावकाराचे आतापर्यंत पाच लाख रूपये कर्ज फेडले, तरी अद्याप त्यांची शेती गहाण मुक्त झाली नसून हा सावकार आता १७ लाख रूपये मागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करून संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-१२-२०१७) :** (१), (२) व (३) अर्जदार श्री. प्रकाश भिकु जाधव यांनी ५ एकर शेतीवरील रुपये १ लाख कर्जावरील ५ लाख इतक्या रकमेची परतफेड करुनही श्री. लक्ष्मणराव देवकते या सावकारांने त्यांची शेती परत केली नसल्याबाबतची तक्रार सहकार अधिकारी श्रेणी-१, सहकारी संस्था, महागांव यांचेकडे दाखल केली आहे.

चौकशी अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणातील व्यवहार हा अवैध सावकारीमध्ये झालेला असल्याने प्रस्तुत प्रकरणात निर्णय देण्यापुर्वी अर्जदार व गैरअर्जदार यांना आपआपले म्हणणे व लेखी जबाब/ पुरावे सादर करण्याकरीता दि.१३.०९.२०१७, दि.२८.०९.२०१७ व दि.११.१०.२०१७ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांच्यामार्फत सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु गैरअर्जदार यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.६४२८/२०१७ दाखल केली आहे. मा.न्यायालयाने सदर प्रकरणात पुढील तारखेपर्यंत कोणतेही आदेश पारीत करु नयेत असे दि.२९.०९.२०१७ रोजीच्या आदेशात नमूद केले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगांवसह राज्यातील जिल्हा बँकांना चलन तुटवडा होत असल्याबाबत**

**(२१) ८५१७६ (१८-०८-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा बँकांना माहे एप्रिल, २०१७ पासून चलन तुटवडा होत असल्याने नागरीक त्रस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच चाळीसगांव शहरातील (जि.जळगांव) जिल्हा बँक शाखेत दररोज १ कोटीचा तुटवडा भासत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार नागरीकांना जिल्हा बँकेकडून पुरेसा चलन पुरवठा व्हावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०५-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे. माहे जून, २०१७ या महिन्यामध्ये जिल्हा बँकेस चलन तुटवडा भासला होता.

(२) स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेकडून मागणीप्रमाणे कॅशचा पुरवठा न झाल्यामुळे जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चाळीसगांव शाखेत माहे जून २०१७ मध्ये कर्ज वितरणासाठी व ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत करण्यासाठी निधीचा तुटवडा भासला. तथापि, सद्यस्थितीत कोणताही चलन तुटवडा भासत नाही.

(३) व (४) नाही. सद्यस्थितीमध्ये जिल्हा बँकेमार्फत पुरेसा चलन पुरवठा होत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील, व्यसन मुक्ती कार्यक्रम व्यापकरित्या राबविण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत.**

**(२२) ८५३६१ (१८-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील, व्यसन मुक्ती कार्यक्रम व्यापकरित्या राबविण्यासाठी, मानसोपचार तज्ञ, पदव्युत्तर तज्ञ, तसेच तज्ञ डॉक्टर यांच्या मार्गदर्शनाखाली समिती गठीत करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह राज्यात, एकूण किती व्यसन मुक्ती केंद्रे सुरु आहेत, यापैकी अनधिकृत व अधिकृत किती आहेत आणि यावर दरवर्षी किती रुपये निधी खर्च करण्यात येत आहे, यातील गैरप्रकारावर नियंत्रण आणण्यासाठी, गठीत केलेल्या समितीने नियमावली बनविण्याचे काम पूर्ण केले आहे काय,

(३) असल्यास, बोगस व्यसनमुक्ती केंद्र चालविणाऱ्यांची चौकशी करण्यात आली काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बोगस व्यसनमुकती चालविणाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच राज्यातील सर्व व्यसनमुक्ती केंद्राची सरकारी नोंदणी बंदनकारक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील काही सहकारी बँका दहाची नाणी स्वीकारत नसल्याबाबत**

**(२३) ८५५८९ (१८-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील काही सहकारी बँका दहाची नाणी स्वीकारत नसल्याने व्यावसायिक व नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याची बाब माहे जून, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दहा रुपयांचे नाणे बंद झाल्याची अफवा पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पसरल्याने व ही नाणी शहरातील काही बँका स्वीकारत नसल्याने किरकोळ विक्रेते व व्यावसायिकांचा नाईलाज होऊन तेही दहाची नाणी स्वीकारत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, गेल्या काही दिवसांपासून दहाची नाणी बंद झाली असल्याच्या अफवा असल्यामुळे पतसंस्थांनी खातेदारांकडून दहाची नाणी स्वीकारू नका असे सांगितले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-१२-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मध्यप्रदेशाच्या धर्तीवर राज्यातील विद्यार्थ्यांना शाळेत जातीचे दाखले देण्याबाबत**

**(२४) ८५६४४ (१८-०८-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्यप्रदेशाच्या धर्तीवर राज्यातील विद्यार्थ्यांना शाळेतच जातीचे दाखले देण्याचा निर्णय राज्य शासनाने माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना शाळातून कोणत्या निकषानुसार दाखले देण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी राज्यात सुरु झाली आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-१२-२०१७) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि, राज्यात दि.०१/०८/२०१५ पासून महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे. सदर अभियानांतर्गत शाळांमध्ये विशेष शिबिरे आयोजित करुन जातीचे दाखले देण्याचे उपक्रम दरवर्षी आयोजित करण्यात येतात.

सदर अभियानांतर्गत राज्यात सन २०१५-१६ मध्ये २८४५८१ जातीचे दाखले व सन २०१६-१७ मध्ये ३७०८७६ जातीचे दाखले असे एकूण मागील दोन वर्षात ६,५५,४५७ इतके जातीचे दाखले वितरीत करण्यात आलेले आहेत.

---

**राज्यात जिल्हा पातळीवरील जात पडताळणी समिती कार्यालयात नियमित पदे भरणेबाबत**

**(२५) ८५६५३ (१८-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३६ जिल्ह्यांमधील जातपडताळणीच्या कामांसाठी केवळ ४ अध्यक्षच कार्यरत असल्याने सुमारे ३ लाखांहून अधिक जातपडताळणीची प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात जातप्रमाणपत्र पडताळणीचे काम १५ समित्यांमार्फत चालविले जात असून एकच समितीकडे अनेक जिल्ह्यांचे कामकाज दिल्यामुळे पडताळणी होण्यास मोठा अवधी लागत असून यामुळे राज्यातील दहावी, १२ वी विद्यार्थी तसेच शासकीय नोकरीत रुजू होणाऱ्या उमेदवारांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,बुलडाणा येथील जात पडताळणी कार्यालयात पुरेसे कर्मचाऱ्यांअभावी विद्यार्थी व नागरिकांची जात पडताळणीची हजारो प्रकरणे प्रलंबीत असल्याचे निवेदन मा. सामाजिक न्याय मंत्री यांना बुलडाणा येथे नागरिकांनी दिनांक १० जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(५) असल्यास, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासह बुलडाणा येथील जात पडताळणी कार्यालयात पूरेसा कर्मचारी वर्ग भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या दि.२१.११.२०१६ पासून कार्यान्वित करण्यात आलेल्या असून त्यावेळी समित्यांवरील अध्यक्षांच्या पदांवर ९ अधिकारी कार्यरत होते. त्यापैकी ४ अधिका-यांची भारतीय प्रशासन सेवेत नियुक्ती करण्यात आल्याने सदर पदे रिक्त झाली. तद्नंतर शासनाने शा.नि.दि. २६.७.२०१७ व दि. २८.७.२०१७ अन्वये समित्यांच्या अध्यक्षांच्या १४ पदांवर नियमित अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. दरम्यानच्या कालावधीत रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपवून समित्यांचे नियमित कामकाज सूरु ठेवण्यात आले होते.

माहे जून, २०१७ अखेर राज्यातील सर्व समित्यांकडे मिळून एकूण ५२७२२ प्रकरणे समितीस्तरावर प्रलंबित होती.

(२) जात वैधता प्रमाणपत्राअभावी कोणत्याही विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये म्हणून प्रलंबित शैक्षणिक प्रकरणे खास मोहिमेद्वारे तातडीने निकाली काढण्याच्या सूचना सर्व समित्यांना देण्यात आल्या असून, त्याप्रमाणे त्यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) बुलढाणा येथील जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीमधील रिक्त पदांचा कार्यभार अन्य अधिका-यांकडे सोपवून समितीचे कामकाज नियमितपणे सुरु ठेवण्यात आलेले

होते. तसेच समितीमध्ये मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने इतर आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.
(५) जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यावरील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून इतर आवश्यक कर्मचारी कंत्राटी तत्वावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

---

## राज्यात बँकांमध्ये रोख रक्कम मिळत नसल्याबाबत

**(२६) ८६७७० (१८-०८-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळकोट (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथील सुनीता जाधव यांच्या मुलीचे लग्न असल्याने जिल्हा बँकेतील ठेवीची रक्कम मिळावी यासाठी बँक अधिकाऱ्यांपुढे मागणी करूनही तिला पैसे मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केसरजवळगा (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथील प्रमोद कांबळे हे देखील बहिणीच्या लग्नासाठी ७० हजारांची जिल्हा बँकेतील ठेव काढण्यासाठी गेले असता चलन तुटवडा असल्याने पैसे मिळणार नाहीत असे सांगितले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून शासनाने संबंधित बँकेवर अथवा कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाइ केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२४-११-२०१७) :** (१) उस्मानाबाद जिल्हा बँकेतील ठेवीदार सुनीता जाधव यांचे जळकोट शाखेमध्ये बचत खाते क्र.४७११ असून या बचत खात्यावर दिनांक २७/३/२०१७ अखेर रु.२२१६५/- जमा रक्कम होती. संबंधितास दिनांक २/५/२०१७ रोजी रक्कम रु.२१,०००/- अदा केली आहे.
(२) केसरजवळगा येथील प्रमोद कांबळे यांचे खाते क्र.३४०५ या खात्यावर दिनांक ५/४/२०१७ रोजी रब्बी पिक विमा रक्कम रुपये ६९८.९४/- व दिनांक १८/५/२०१७ रोजी खरीप पिक रक्कम रुपये ५३१३.६०/- जमा अंती ६९८२/- एवढी रक्कम जमा होती. संबंधितास दिनांक ७/७/२०१७ रोजी रुपये ५९००/- अदा केलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## स्टेट टान्सपोर्ट को.ऑप. बँकेच्या सहाय्यक लेखाधिकारी या पदासाठीच्या परिक्षा भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२७) ८६९८४ (१८-०८-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्टेट टान्सपोर्ट को.ऑप.बँकेने ४४ सहाय्यक लेखधिकारी या रिक्त असलेल्या पदांकरता दादर (मुंबई) येथील शारदाश्रम शाळेत दिनांक १६ एप्रिल, २०१७ रोजी घेतलेल्या परिक्षेमध्ये व पेपर तपासण्यामध्ये अनेक गैरप्रकार घडल्याच्या तक्रारी परिक्षार्थींनी रणजितसिंह देओल, अध्यक्ष, स्टेट टान्सपोर्ट को.ऑप.बँक लि. तसेच बँकेच्या अन्य पदाधिकाऱ्यांकडे लेखी स्वरुपात केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.टी बँकेच्या सहाय्यक लेखाधिकारी या पदासाठीची परिक्षा रणजितसिंह देओल, अध्यक्ष, स्टेट टान्सपोर्ट को.ऑप.बँक लि. यांच्या गैरहजेरीत घेतल्याची बाब दिनांक १५ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर परिक्षा व निकाल रद्द करुन पुन्हा घेण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-१२-२०१७) :** (१) व (२) होय. अंशत: खरे आहे.

कर्मचाऱ्यांच्या बढतीसाठी बँकेने १) बँक निरिक्षक, २) शाखा व्यवस्थापक व ३) उपलेखाकार या तीन पदांसाठी दिनांक १६.४.२०१७ रोजी खातेनिहाय परिक्षा आयोजीत करण्यात आली होती. त्यानुसार दिनांक ४.५.२०१७ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार सदर परिक्षेचा निकाल बँक अध्यक्षांच्या अनुपस्थितीत जाहीर करण्यात आला होता.

मात्र निकाल जाहीर झाल्यानंतर सदर परीक्षेमध्ये गैरव्यवहार झाल्याचे वृत्त दैनिक पुढारी या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झाल्याने परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या १५ कर्मचाऱ्यांनी उत्तरपत्रिकांची फेरतपासणी करण्याबाबत व काही कर्मचाऱ्यांनी फेरपरीक्षा घेण्याबाबतचे अर्ज अध्यक्ष तसेच बँक प्रशासनास सादर केले.

(३) व (४) उपरोक्त परिक्षेबाबत बँकेच्या कोल्हापूर शाखेतील एका कर्मचाऱ्याने औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर येथे याचिका क्र. १६३/२२०१७ दाखल केली असून सदर याचिका अद्याप प्रलंबीत आहे.

अनुत्तीर्ण झालेल्या १५ कर्मचाऱ्यांनी बँकेच्या अध्यक्षांना केलेले अर्ज व दैनिक पुढारी मध्ये आलेल्या बातमीच्या अनुषंगाने बँकेच्या अध्यक्षांनी खातेनिहाय बढतीच्या परिक्षेमध्ये पारदर्शकता व नियमांमध्ये सुधारणा करुन परिक्षा घेण्याचे निर्देश दिले आहेत. बँकेच्या अध्यक्षांच्या सदर निर्देशाविरुद्ध बँकेतील मान्यताप्राप्त संघटना " को.ऑप बँक एम्प्लॉईज युनियन " या संघटनेने औद्योगिक न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. २१७/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उस्मानाबाद जिल्ह्यातील तेरणा शेतकरी सह. साखर कारखान्याच्या निवडणूकीबाबत

**(२८) ८७०२२ (०९-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील तेरणा शेतकरी सह. साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक ३ वर्षापूर्वी झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सह. साखर कारखान्यावर ३ वर्षांपासून प्रशासकाची नेमणूक केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सह. साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची निवडणूक न घेण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाकडून सदरिल कारखान्याची निवडणूक केंव्हा घेण्यात येणार आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-१२-२०१७) :** (१) नाही, कारखान्याच्या संचालक मंडळाची निवडणूक सन २०१७ मध्ये झाली आहे.

(२) सदर साखर कारखान्यावर दि.०४/०२/२०१७ रोजी प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) तेरणा सहकारी साखर कारखान्याला निवडणूकीसंबधीची प्रपत्र ई-२ मधील माहिती तसेच मतदार यादी सादर करण्यासाठी साखर आयुक्तांनी वारंवार लेखी सूचना देवूनही माहिती सादर केली नाही. सदर कारखान्याची मुदत दि.१२/०७/२०१२ रोजी संपली असून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअ नुसार संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत संपण्यापूर्वी निवडणूका घेण्याबाबतचे कळविण्याची आणि तिच्या व्यवस्थेसाठी सहाय्य करण्याची समितीचे कर्तव्य असेल याप्रमाणे समितीच्या जबाबदारीचे पालन संचालक मंडळाने केले नसल्याने तेरणा साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची निवडणूक घेता आली नाही.

(४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ आणि संस्थेच्या उपविधीतील नोंदणी व व्यवस्थापन याबाबतच्या शर्तीचे अनुपालन / काम करण्याचे बंद केले आहे. कारखान्यांनी नोंदणी ज्या उद्देशासाठी करण्यात आली आहे, ते उद्देशच वरील बाबीमुळे ठप्प झालेले आहेत. त्यामुळे सदर कारखान्याचे समापनाचे अंतरिम आदेश दि. ०२/०८/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेले असून कलम १०३ (१) अन्वये अवसायकांची नियुक्ती करण्यात आलेली असल्याने निवडणूका घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मौजे कौडगांव (ता.जि. उस्मानाबाद) येथे सौर उर्जा प्रकल्पाची उभारणी करणेबाबत

**(२९) ८७५४० (१८-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कौडगांव (ता.जि. उस्मानाबाद) येथे १५०० एकर जमिन संपादित करण्यात आली असून तेथे महाजनकोचा ५०० मेगावॅटचा सौरउर्जेवर आधारीत वीज निर्मिती प्रकल्प सुरु करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वीज निर्मितीच्या प्रकल्पाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,
(३) तसेच या प्रकल्पाचे काम केंव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-१२-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे कौडगांव (ता.जि. उस्मानाबाद) येथील ११८.३२ हेक्टर जमिनीवर महानिर्मितीव्दारे ५० मेगावॅट क्षमतेचा सौर उर्जेवर आधारित वीज निर्मिती प्रकल्प आस्थापित करण्याचे प्रस्तावित आहे.

(२) शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोत (अपारंपरीक ऊर्जा स्त्रोत) यापासून वीज निर्मितीच्या पारेषण संलग्न प्रकल्पासाठी एकत्रित धोरण-२०१५ नुसार निविदा मागविण्यात आली असून महानिर्मितीव्दारे पुढील प्रक्रिया सुरू आहे.

(३) सदर प्रकल्प वर्ष २०१८ अखेर पर्यंत कार्यान्वित करणे नियोजित आहे.

---

## राज्यात गृहनिर्माण संस्थेचे स्वंतत्र प्राधिकरण स्थापन करण्याबाबत

**(३०) ८७९०८ (१८-०८-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गृहनिर्माण संस्थांसाठी स्वंतत्र प्राधिकरण तयार करावयाची घोषणा मा. सहकार मंत्र्यांनी दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये एकूण सहकारी संस्थांपैकी १० टक्के म्हणजे जवळ जवळ ९० हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहकार कायद्यातून सहकारी गृहनिर्माण कायदा वेगळा करून स्वतंत्र सहकारी गृहनिर्माण कायदा करावा अशी अनेक वर्षापासून मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची काय कारणे आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-१२-२०१७) :** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी स्वतंत्र प्रकरण समाविष्ट करण्यासंदर्भात दि.१०/२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली असून सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या संनियंत्रणासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याच्या तरतूदींचा समावेश करण्यात आला आहे.

(२) राज्यात दि.३१/३/२०१७ अखेर १,९५,३०१ इतक्या सहकारी संस्थांपैकी १,०१, ५४२ इतक्या गृहनिर्माण सहकारी संस्था आहेत.

(३) नाही.

(४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी स्वतंत्र प्रकरण समाविष्ट करण्यासंदर्भात दि.१०/२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालेगांव (जि.नाशिक) पॉवरलुम उद्योगाला इतर शेजारील राज्याप्रमाणे सोयी सुविधा देण्याबाबत

**(३१) ८८१५५ (१८-०८-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे मोठ्या प्रमाणावर पॉवरलुम असून हे उद्योग मागील काही वर्षापासून मंदीत असून या उद्योगाला पुनर्जिवन देण्याकरिता इतर शेजारील राज्याप्रमाणे सोयी सुविधा देण्याबाबत शासन दुर्लक्ष करीत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त व्यवसाय वाचविण्याकरिता प्रती लुम ५०,००० विना व्याजी कर्ज तसेच राजस्थान व अहमदाबाद राज्यांप्रमाणे सबसीडी देणे, वॉटर ट्रीटमेंट प्लॉन देणे तसेच प्रोसेस करिता सुविधा पुरवावी तसेच मालेगांव इंडसट्रीज झोन घोषीत करुन एक्सप्रेस फिडरची सवलत उपलब्ध करावा व डी प्लस झोनचा लाभ पॉवरलुम धारकांना देवून सदरहू उदयोग पुर्नजिवित होईल याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३०-१२-२०१७) :** (१) नाही.
(२) यंत्रमाग धारकांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून खालील योजना राबविण्यात येतात.

१) साध्या यंत्रमागधारकांसाठी केंद्र पुरस्कृत Pilot Scheme of in-situ Upgradation of Plain powerloom for S.S.I योजनेंतर्गत यंत्रमागधारकास केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य देण्यात आल्यानंतर राज्य शासनामार्फत प्रतीमाग ३३.३३ टक्के अथवा रु.१०,००० यापैकी जी रक्कम कमी असेल ती प्रत्येक यंत्रमागधारकास अधिकतम अर्थसहाय्य रु.८०,००० इतके देण्यात येते.

२) तसेच राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजनेंतर्गत यंत्रमाग सहकारी संस्थांना भाग भांडवल व कर्ज वितरीत करण्यात येते.

३) महाराष्ट्र विज नियामक आयोगाच्या आदेशानुसार दिनांक १/११/२०१६ पासून २७ अश्वशक्ती पर्यंत रु.५.५१ प्रती युनिट २७ अश्वशक्ती वरील यंत्रमाग धारकांना रु.६.८५ प्रती युनिट वीज दर आकारण्यात येत आहे. त्यात राज्यशासन अनुक्रमे रु.२.८५ व रु. ४.१९ प्रती युनिट वीज दर सवलत देत असून यंत्रमाग धारकांना रु.२.६६ प्रती युनिट दराने विज पुरवठा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मेघवाल समाजास जातीचे प्रमाणपत्र मिळविण्यात येत असलेल्या अडचणींबाबत**

**(३२) ८८२७८ (१८-०८-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मेघवाल समाजाला जातीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी जाचक ठरत असलेली सन १९५० पूर्वीची वास्तव्याची अट शिथील करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे मा.सामाजिक न्याय मंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-१२-२०१७) :** (१) हे खरे आहे.

श्री.सुनिल शिंदे, मा.विधानसभा सदस्य यांचे दि.२२/०३/२०१७ रोजीचे पत्र या विभागास प्राप्त झालेले आहे.

(२) राज्याच्या अनुसूचित जाती यादीत मेंघवाल समाजाचा समावेश आहे.

जात प्रमाणपत्र देणे व जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कामकाज हे सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३ तसेच त्या अंतर्गत तयार करण्यात आलेले नियम, २०१२ मधील तरतुदीनुसार तसेच मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार चालते. सदर नियमानुसार जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता आवश्यक ते जातीचे पुरावे, कागदपत्रे देण्यात आल्यास, सदर प्रमाणपत्र प्राप्त होण्यास कोणतीही अडचण उद्‌भवत नाही.

तसेच अर्जदार आवश्यक ते जातीचे पुरावे, कागदपत्रे देण्यास असमर्थ असेल तर अशाबाबतीत, अर्जदार आपल्या शपथपत्रामध्ये त्या बाबतचे कारण नमूद करील आणि सक्षम प्राधिकारी त्यावर विचार करून त्यांना योग्य वाटेल अशी चौकशी करून, गुणवत्तेनुसार त्या दाव्यावर निर्णय घेतील, अशी सदर नियमात तरतूद आहे.

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या व्यक्तीस जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देतांना दि. १० ऑगस्ट, १९५० च्या सर्वसाधारण रहिवासाची अट केंद्र शासनाने घातलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चांदूर रेल्वे तालुक्यातील (जि.अमरावती) घुईखेड येथील शेतकऱ्याचे पीक कर्ज स्टेट बँकेने बचत खात्यातून वळते करुन घेतल्याबाबत**

**(३३) ८८८९८ (२३-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर रेल्वे तालुक्यातील (जि.अमरावती) घुईखेड येथील एक कर्जबाजारी शेतकरी श्री.मेश्राम यांचे पीक कर्ज स्टेट बँकेने त्यांना न विचारताच नियम बाह्यपणे त्यांच्या बचत खात्यातून वळते करुन घेतले असल्याचे माहे जानेवारी दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बँकेच्या अधिकाऱ्याने या शेतकऱ्याला पोलीसात तक्रार केल्याची धमकी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बँकेविरोधात कारवाइ व्हावी यासाठी संबधित अधिकारी व मंत्री यांना निवेदन देवून आत्महत्येचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या शेतकऱ्याच्या निवेदनाची दखल घेवून सदर बँकेच्या व्यवस्थापनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-१२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे. श्री.लहानु सु. मेश्राम यांनी दि.८/६/२०१२ रोजी रूपये ३०,०००/- कर्ज घेतले होते. सदर खाते NPA होणार होते. खरीप पिक कर्ज वाटप २०१६ च्या दरम्यान याबाबतची माहिती श्री. मेश्राम यांना दिली होती. सदर खाते NPA होण्याचे वाचविण्यासाठी संबंधित खात्यातून रक्कम कपात करण्यात आली.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) सदर शेतकऱ्याची तक्रार प्राप्त झाल्यावर बँक शाखा व्यवस्थापक घुईखेड यांनी तक्रारकर्त्याशी प्रत्यक्ष भेटून सविस्तर चर्चा करुन त्याचे समाधान करण्यात आले. ह्या विषयावर त्यांची कुठलीही तक्रार राहीली नसून त्यांनी तसे लेखी निवेदन बँकेला दिले असल्याचे सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जालना जिल्हयातील नाफेडच्या तूर खरेदी केंद्रावर बेवारस तुर सापडल्याबाबत

**(३४) ८९००९ (१८-०८-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हा येथील नाफेडच्या तूर खरेदी केंद्रावर सुमारे ९४२ क्विंटल बेवारस तुर सापडली असून जिल्हा प्रशासनाने पंचनामा करुन ती ताब्यात घेतली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२७-११-२०१७) :** (१), (२) व (३) राज्यशासनाच्या बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत जालना कृषि उत्पन्न बाजार समितीकडील झालेल्या नोंदणीनुसार ९६ शेतकऱ्यांकडून ७०७० तूर खरेदी होणे अपेक्षित होते. जिल्हाधिकारी, जालना यांच्या आदेशानुसार दिनांक २/५/२०१७ ते दिनांक ९/५/२०१७ पर्यत ६४ शेतकऱ्यांकडून २७६०.५० क्विंटल तूर खरेदी करण्यात आली. उर्वरित शेतकरी गैरहजर असल्याने शिल्लक १४७४ कट्टे पंचनामा करुन पोलीसांच्या ताब्यात देण्यात आली. तद्नंतर, शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करुन तुरीची मागणी केल्यामुळे, तहसिलदार जालना यांच्या अध्यक्षतेखालील नियुक्त समितीने कागदपत्रे व पुराव्याची पडताळणी करुन ३६ शेतकऱ्यांना ७३४ कट्टे तूर परत केली. उर्वरित ७४० कट्टे तूर पावसात भिजू नये यासाठी जालना कृषि उत्पन्न बाजार समितीच्या बंद गोदामात सुरक्षित ठेवण्यात आली आहे.

सदरच्या ७४० कट्टे पैकी ६४० कट्टे तूर परत मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या अर्जावर तहसिलदार, जालना यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या घेरडी (ता.सांगोला) येथील शाखेत झालेल्या अपहाराबाबत**

**(३५) ८९२६६ (१८-०८-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या घेरडी ता.सांगोला येथील शाखेत खातेदारांच्या खात्यावरील रक्कम परस्पर काढून बँक कर्मचारी फरार झाल्याचे माहे एप्रिल,२०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती गैरव्यवहार करणाऱ्या बँक कर्मचारी व संचालक मंडळ यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-१२-२०१७) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

घेरडी, ता. सांगोला येथील शाखेत खातेदारांच्या खात्यावरील रक्कम परस्पर काढल्याचे दि.१/६/२०१७ रोजी बँकेच्या निदर्शनास आले.

(२) व (३) बँकेच्या स्तरावर चौकशी केली असून सदर प्रकरणी बँकेने प्राथमिक चौकशी करून दोषी आढळून आलेल्या बँक कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. तसेच भारतीय दंड संहिता कलम ४०९, ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२१ बी ३४ खाली सांगोला पोलीस ठाण्यात दि.२२/६/२०१७ रोजी एफ.आय.आर. क्र.४३८ अन्वये बँकेने गुन्हा दाखल केलेला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**जळगांव जिल्ह्यातील शेतकरी कर्जाअभावी अडचणीत आलेबाबत**

**(३६) ८९२७९ (१८-०८-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी सततचा दुष्काळ, नापिकी, कर्ज यामुळे त्रस्त झाले असून जळगांव जिल्ह्यातील शेतकरी कर्जाअभावी अडचणीत आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्ज उपलब्ध होण्यासाठी जुन्या कर्जाचे पुनर्गठण होणे गरजेचे असून त्यासाठी जिल्हा बँकेला शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने जिल्हा बँकांना त्वरीत कर्ज वाटपासाठी रोख रक्कमेच्या उपलब्धतेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२४-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) शासन निर्णय, दिनांक २८/६/२०१७ व दिनांक ८/९/२०१७ अन्वये शेतकऱ्यांच्या थकीत कर्जाच्या माफीबाबत " छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना - २०१७ " अंमलात आणलेली आहे. सदर योजनेअंतर्गत थकबाकीदार शेतकऱ्यांना शासन निर्णयातील निकषाप्रमाणे रु.१.५० लाखापर्यंतचे थकीत कर्ज माफ होणार आहे व ज्या शेतकऱ्यांनी सन २००९-१० ते २०१५-१६ या वर्षात कर्जाचे पुनर्गठन केलेले आहे व अशा शेतकऱ्यांपैकी जे शेतकरी दिनांक ३१/७/२०१७ रोजी थकबाकीदार असतील त्यांना वरील योजनेचा लाभ देण्यात येणार असल्यामुळे जुन्या कर्जाच्या पुनर्गठनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची गरज नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कांद्याला हमीभाव देणेबाबत**

**(३७) ९०२५१ (१८-०८-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री, जि.धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा खरेदी दिवशीच व्यापाऱ्यांनी कांद्याचे भाव कमी केल्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी साक्री पिंपळनेर रस्त्यावर रास्ता रोको केला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आंदोलनाची दखल घेवून शासनाने राज्यातील सर्वत्र कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कांद्याना हमीभाव जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२७-११-२०१७) :** (१) कृषि उत्पन्न बाजार समिती,साक्री येथे दिनांक १०/१/२०१७ रोजी कांद्याच्या खरेदी-विक्रीचा शुभारंभ केल्यानंतर बाजार समितीत आलेल्या ३१ वाहनांमधील कांदा लिलावास सुरु केल्यानंतर कांद्यासाठी किमान १४०, कमाल ५१० व सरासरी ३७० प्रति क्विंटल भाव न पटल्यामुळे,शेतकऱ्यांनी लिलाव प्रक्रिया बंद करुन साक्री-पिपळनेर हा रस्ता अडवून तेथे कांद्याची वाहने लावून रास्ता रोको आंदोलन केले होते. सदर आंदोलन स्थानिक पोलिस खात्याकडून शांत करण्यात आले.

बाजार समितीचे सभापती, शेतकरी, व्यापारी यांची संयुक्त बैठक घेऊन कांद्याला चांगला भाव देण्याच्या सुचना देवून नव्याने फेरलिलाव करण्याचे ठरविले.तथापि, बाजार समितीमध्ये कांद्याची त्यानंतर आवक न झाल्यामुळे व्यवहार झाले नाहीत.

(२) शेतमालाला हमीभाव केंद्रशासनामार्फत घोषित केले जातात.कांदा हा नाशिवंत शेतमाल असल्यामुळे, कांद्याला हमी भाव घोषित केला जात नाही. मात्र कांद्याचे दर कोसळल्यामुळे राज्यशासनाने शासन निर्णय, दिनांक ३१/८/२०१७ अन्वये राज्यातील ज्या शेतकऱ्यांनी जुलै, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्री केला आहे. अशा शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये १००/- व जास्तीत जास्त २००/- क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. या योजनेंतर्गत धुळे जिल्ह्यातील २२०६ शेतकऱ्यांना रुपये ८६,०४,००४/- इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सिध्दापूर व सलगर (ता.मंगळवेढा) या शाखेने शासनाच्या आदेशाविरूध्द पिकविम्याची रक्कम शेतक-यांच्या कर्जखात्यात जमा केल्याबाबत**

**(३८) ९०४६३ (१८-०८-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या पिक विम्याची रक्कम कपात न करता शेतक-यांना द्यावी असा निर्णय शासनाने जिल्हा बँकांना दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या आदेशाची अवहेलना करुन सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सिध्दापूर व सलगर (ता.मंगळवेढा) या शाखेने पिक विम्याची रक्कम शेतक-यांच्या कर्जखात्यात जमा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शाखेअंतर्गत येणाऱ्या मंगळवेढा तालुक्यातील १६ गावातील शेतक-यांनी उक्त बँकेने पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना विश्वासात न घेता परस्पर त्यांच्या कर्जखात्यात टाकल्याने ती परत मिळावी अशी मागणी करणारे निवेदन शेतकऱ्यांनी जिल्हा उपनिबंधक व तहसिलदार यांच्याकडे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी सदर बँकेविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना परत करण्याच्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-१२-२०१७) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) पिकविम्याच्या रक्कमा संबंधित कर्जदारांच्या सेव्हींग खाती जमा केल्या आहेत. काही सभासदांच्या रक्कमा त्यांच्या संमतीने कर्ज खाती घेतल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पारस (जि.अकोला) येथे औष्णिक विदयुत प्रकल्पासाठी शेतकऱ्यांकडून संपादीत केलेल्या जमिनी विनावापर पडून असल्याबाबत**

**(३९) ९०४९६ (०९-०८-२०१७). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारस (जि.अकोला) येथे वाढीव ५०० मेगावॅट औष्णिक विदयुत प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनी विनावापर पडून असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पासाठी जमिन आणि पाण्याची व्यवस्था असूनही प्रकल्पाची उभारणी करण्यात येत नसून तो विनाविलंब सुरु करण्याबाबत मा.मुख्यमंत्र्याकडे पत्राद्वारे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१२-२०१७) :** (१) पारस (जि. अकोला) येथे वाढीव २५० मे.वॅ. औष्णिक ऊर्जा प्रकल्प प्रस्तावित आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाच्या दिनांक १३.११.२००९ च्या पत्रकानुसार १३ व्या योजनेच्या अंतर्गत नवीन औष्णिक विद्युत प्रकल्प हे फक्त Supercritical Technology वर आधारित राहतील. त्यानुसार पारस या ठिकाणी ६६० मे.वॅ. च्या प्रकल्पासाठी आवश्यक पाणी व जमिनीची उपलब्धता नसल्यामुळे सदर प्रकल्प तूर्त स्थगित ठेवण्यात आलेला आहे, परंतु सदर प्रकल्पाच्या परिसरातील शिल्लक असलेल्या १२६.४८ हेक्टर जागेवर ६० मे.वॅ. क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प महानिर्मिती कंपनीमार्फत उभारण्याचे नियोजन आहे.

---

**राज्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्याबाबत**

**(४०) ९०८१६ (१८-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व बैठकीत मागेल त्या शेतक-याला पीक कर्ज देण्यासाठी बँकानी प्रयत्न करावेत असे आदेश बँकाना दिले असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात नियोजनबध्द कृती आराखडा तयार करण्यासाठी मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात अनेक ठिकाणी सातबारा कोरा असल्याशिवाय कर्ज देता येणार नाही अशी भूमिका बँकानी घेतल्यामुळे शेतकऱ्यांनी कर्ज देण्यास नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रश्न ३ नुसार यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कर्जपुरवठा नाकारलेल्या शेतक-यांना कर्जपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२४-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नाही.
(४) राज्यातील विविध बँकांमार्फत शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्यात येत आहे. तसेच आर्थिक अडचणीतील १४ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या १६ जिल्ह्यामध्ये शासन परिपत्रक, दिनांक ६/६/२०१७ नुसार सुलभ पीक कर्ज अभियान राबविण्यात आले. त्यानुसार दिनांक ३१/७/२०१७ अखेर १९३४ कर्ज मेळाव्याद्वारे ५३३५० शेतकऱ्यांना बँकांमार्फत रु. ३७९.९४ कोटीचे पीक कर्ज वाटप करण्यात आले. तसेच शासन निर्णय दिनांक १४/६/२०१७ अन्वये शेतकऱ्यांना शासनहमीवर रु. १०,०००/- पर्यंतचे पीक कर्ज देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दिनांक ३१/८/२०१७ अखेर ५२९६१ शेतकऱ्यांना रु.५२.७७ कोटींचे पीक कर्ज वाटप बँकांनी केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## काटोल व नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना सावकारी कर्जातून मुक्ती मिळण्याबाबत

**(४१) ९१५२१ (१८-०८-२०१७). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील काटोल व नरखेड तालुक्यातील शेतकरी तालुका कार्यक्षेत्राची अट, ७/१२ धारकांच्या राशन कार्डावर कर्जदाराचे नाव नसणे, ७/१२ धारक व्यक्तींच्या कुटुंबातील एकाच व्यक्तीला कर्ज मिळणार या बंधनकारक अटीमुळे अपात्र ठरवून सावकारी कर्ज मुक्तीचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका कार्यक्षेत्राची अट रद्द करून जिल्हा कार्यक्षेत्र करणे, ७/१२ धारक व्यक्तीच्या राशन कार्डावर कर्जदाराचे नाव असणे बंधनकारक नसणे या अटी रद्द करण्याची मागणी अनेक वर्षापासून जनप्रतिनिधी व कर्जदारांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शेतकऱ्यांच्या मागणीबाबत शासन परिपत्रकात आवश्यक सुधारणा करून सावकारी कर्जातून मुक्त करण्यासाठी शसनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत काहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-१२-२०१७) :** (१) विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जास माफी देण्याबाबत शासन निर्णय क्र. एमएलए१०१५/ प्र.क्र.२५/७-स, दिनांक-१०.०४.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आला. सदर शासन निर्णयातील लाभार्थीच्या पात्रतेच्या निकषांची पुर्तता करणाऱ्या सावकारग्रस्त शेतकऱ्यांना सावकारी कर्जमाफी योजनेचा लाभ देण्यात आला आहे.
(२) व (३) सदर मुद्यांबाबत कर्जदाराकडून तसेच जनप्रतिनिधीकडून निवेदने प्राप्त झालेली आहेत तथापि शासन निर्णय दि.१०.०४.२०१५ मध्ये सुधारणा करण्याबाबत सद्यस्थितीत शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील जिल्हा बँकेच्या शेवाळेवाडी-म्हासोली शाखेत खातेदारांच्या खात्यावरील पैसे परस्पर काढून अपहार केलेबाबत

**(४२) ९२६६३ (१८-०८-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील जिल्हा बँकेच्या शेवाळेवाडी-म्हासोली शाखेत खातेदारांच्या खात्यावरील पैसे परस्पर काढून बँकेत सुमारे सव्वा दोन कोटींचा अपहार करण्यात आल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच खातेदारांना त्यांचे पैसे मिळण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२४-११-२०१७) :** (१) होय. माहे नोव्हेंबर २०१६ च्या बँकेच्या तपासणीत व त्यानंतर वैधानिक लेखापरीक्षक यांच्यामार्फत तपासणी करण्यात आली असता सुमारे २ कोटी २५ लाख रक्कमेचा अपहार झाल्याची बाब स्पष्ट झाली आहे.
(२) दिनांक १७/३/२०१७ रोजी कराड ग्रामीण पोलीस स्टेशन यांच्याकडे एफ. आय.आर. दाखल केले आहे. तसेच संबंधित शाखाप्रमुख व कॅशियर यांना बँकेच्या व्यवस्थापनाने निलंबित केले असून बँकेमार्फत खातेनिहाय चौकशी सुरू आहे.

वसुलीसाठी सहकार न्यायालय सातारा येथे दाखल केलेल्या दावा क्र. १९०/२०१७ मध्ये मा. सहकार न्यायालयाच्या दि. १३/६/२०१७ च्या आदेशान्वये प्रतिवादी, तत्कालीन कॅशियर व तत्कालीन शाखाप्रमुख यांच्या मालमत्तेवर बोजा नोंद करण्याचे आदेश दिले आहेत.
(३) बँकेने संबंधित खातेदारांना पैसे देण्याकरिता अपहार येणे खाती रक्कम नावे लिहून संबंधित सर्व खातेदारांना रक्कमा अदा केल्या आहेत. त्याबाबत ग्राहकांची कोणतीही तक्रार राहिली नाही, असे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सातारा यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने पीक कर्ज वाटप थेट सेवा सोसायट्यांच्या माध्यमातून करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(४३) ९२८७४ (१८-०८-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतकऱ्यांना जिल्हा सहकारी बँकाच्या माध्यमातून पीक कर्ज वाटप करण्याऐवजी थेट सेवा सोसायट्यांच्या माध्यमातून करण्याबाबत राज्य शासनाकडून राष्ट्रीयकृत बँकाना प्रस्ताव पाठवला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपाच्या प्रक्रियेतून जिल्हा सहकारी बँकांना काढण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, खरीप हंगामासाठी आतापर्यंत शेतकऱ्यांच्या प्रस्तावानुसार सेवा सोसायटीने कर्ज वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-१२-२०१७) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) शेतकऱ्यांना द्यावयाच्या अल्पमुदत पीक कर्ज वाटप प्रक्रियेमधून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाना वगळण्यात आलेले नाही.

राज्यातील धुळे-नंदूरबार, जळगाव, नाशिक, सोलापूर, बीड, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, जालना, बुलडाणा, यवतमाळ, अमरावती, वर्धा, व नागपूर या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे पीक कर्ज वाटपासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसल्याचे एप्रिल २०१७ मध्ये निदर्शनास आले.

विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेकडील जे शेतकरी कर्ज घेण्यास पात्र आहेत, तथापि संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे पुरेसा निधी नसल्याने त्यांना पीक कर्ज मिळू शकत नाही, अशा शेतकऱ्यांना व्यापारी बँकाकडून पीक कर्ज पुरवठा करण्यासाठी शासन परिपत्रक दि.०६.०६.२०१७ नुसार सुलभ पीक कर्ज अभियान उपरोक्त १४ जिल्हा बँकांच्या कार्यक्षेतील १६ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

(३) राज्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करण्यासाठी राज्यस्तरीय बँकर्स समितीमार्फत सन २०१७-१८ साठी व्यापारी बँकांना रू. ३६६३० कोटी रक्कमेचा लक्षांक देण्यात आला असून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना रू.१७५९१ कोटी रक्कमेचा लक्षांक दिलेला आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे कर्ज वाटप विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांमार्फत शेतकऱ्यांना करण्यात येत असून दि. ३०/९/२०१७ अखेरपर्यंत १८.२१ लाख शेतकऱ्यांना रू. ८२३२.९३ कोटी रक्कमेचे कर्ज वाटप करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पवन ऊर्जा निमिर्तीचे उद्दिष्ट केंद्र शासनाने राज्यांना दिल्याबाबत**

**(४४) ९३१२६ (१८-०८-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा (नवीन व नवीकरणीय ऊर्जा) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पर्यावरणपूरक पवन ऊर्जेला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने राज्यांना पुढील पाच वर्षासाठी उद्दिष्ट ठरवून दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत केंद्र शासनाने राज्य शासनास किती मेगावॉट ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट दिले आहे व शासनाने दिनांक ३० जून, २०१७ अखेर किती मेगावॉट ऊर्जा निर्मिती केली आहे,
(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-११-२०१७) :** (१) नाही. तथापि, राज्य शासनाने शासन निर्णय क्र.अपाऊ-२०१५/प्र.क्र.४९/ऊर्जा-७,दि. २० जुलै, २०१५ व दि. ३ डिसेंबर, २०१६ अन्वये "नवीन व नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांपासून वीज निर्मिती एकत्रित धोरण-२०१५ " जाहिर केले असून या अंतर्गत पवन ऊर्जा निर्मितीव्दारे ५००० मेगावॅट वीज निर्मितीचे उद्दिष्ट पुढील ५ वर्षासाठी निश्चित केले आहे. यामध्ये १५०० मेगावॅट हे Renewable Purchase Obligation पूर्ण करण्यासाठी व ३५०० मेगावॅट (३००० मेगावॅट राज्याबाहेर व ५०० मेगावॅट राज्यात) स्वयंवापर किंवा समूह स्वयंवापर किंवा तिसऱ्या घटकास विक्रीसाठी विकसित करण्यासाठी आहे.
(२) पवन ऊर्जा निर्मिती बाबतच्या राज्य शासनाच्या २०१५ च्या धोरणांतर्गत आतापर्यंत एकूण १६०३.५ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजुरा (जि.चंद्रपूर) येथील शासकिय,अर्धशासकिय सेवक सहकारी पतसंस्था कोरपना शाखेकरिता बांधण्यात आलेल्या इमारतीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४५) ९३३४८ (१८-०८-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) येथील शासकिय, अर्धशासकिय सेवक सहकारी पतसंस्थेच्या कोरपना शाखेकरिता मागील वर्षी बांधण्यात आलेल्या इमारतीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त इमारतीचे छत गळत असल्याने भिंती ओल्या राहत असून कर्मचाऱ्यांना त्याचा त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त इमारतीच्या बांधकामाबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्नुसार त्यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-१२-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.

सदर पतसंस्थेच्या कोपरना शाखेच्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबतची तक्रार कोपरना शाखेचे तत्कालीन शाखा व्यवस्थापकांनी संस्थेकडे दिनांक ९.१०.२०१६ रोजीच्या पत्रान्वये केली होती.
(३) व (४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने संस्थेने ३ संचालक व संस्थेतर्फे नियुक्त केलेला अभियंता अशी ४ सदस्यीय चौकशी समिती नेमली असून त्यानुसार समितीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आजनगांव (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथील गुरूदेव विद्यालय सेवकांच्या पतसंस्थेत पदाधिकाऱ्यांनी लाखो रूपयांचा अपहार केल्याबाबत**

**(४६) ९३३७९ (१८-०८-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरोरा तालुक्यातील (जि.चंद्रपूर) आजनगांव येथील गुरूदेव विद्यालय सेवकांच्या पतसंस्थेत पदाधिकाऱ्यानी प्रत्यक्षात आमसभा न घेता कागदोपत्री आमसभा घेतल्याचे दाखवून लाखो रूपयांचा अपहार केल्याची घटना दिनांक ५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-१२-२०१७) :** (१) हे खरे नाही.

मात्र सदर पतसंस्थेच्या काही सभासदांनी, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी कागदोपत्री आमसभा घेऊन लाखोंचा अपहार केल्याची तक्रार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांचेकडे दिनांक ५.६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये केली होती.

(२) व (३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांचे कार्यालयाकडून चौकशी करण्यात आली असून त्यामध्ये रक्कमेचा अपहार झाल्याचे दिसून आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यात जातपडताळणी कार्यालयातील कामकाज मागील चार महिन्यांपासून बंद असल्याबाबत

**(४७) ९३४९७ (१८-०८-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात शैक्षणिक प्रवेश तसेच अन्य सरकारी कामांसाठी जातीचे प्रमाणपत्र जातपडताळणी विभागाकडून पडताळून घेणे बंधनकारक असून सदर कार्यालयातील कामकाज मागील चार महिन्यांपासून बंद असल्याचे दिनांक १३ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर जातपडताळणी कार्यालयाचे कामकाज सूरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०१-२०१८) :** (१) नाही.

समितीवरील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्याकडे सोपविण्यात येवून समित्यांचे नियमित कामकाज सुरु ठेवण्यात आले आहे.

(२) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कालबाह्य झालेले रेकॉर्ड रद्दीच्या दराने विकलेबाबत

**(४८) ९३६४६ (२३-११-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुने रेकॉर्ड जतन करण्यासंदर्भात रिझर्व्ह बँकेचे असलेले निर्देश बाजूला ठेऊन नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कालबाह्य झालेले रेकॉर्ड विगतवारी न करता रद्दीच्या दरात म्हणजे सात रुपये १० पैसे किलो या दराने दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास समीर ट्रेडर्स यांना विकल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रद्दीचा ठेका देताना ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०१-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नाशिक या बँकेने रिझर्व बँकेच्या दि.२९ जानेवारी, १९७१ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे कालबाह्य झालेले रेकॉर्डची विगतवारी करुन समीर ट्रेडर्स यांना विक्री केलेली आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील को. ऑप. हौसिंग सोसायटीच्या कार्यकारिणीस सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात येणाऱ्या त्रासाबाबत**

**(४९) ९३७०० (१८-०८-२०१७). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटिशन नंबर ५४४/२०११ अन्वये महाराष्ट्र को. ऑप. हौसिंग सोसायटी कायद्याअंतर्गत येणाऱ्या सोसायटीमधील १/३ सभासदांची अनुमती नसेल तर कार्यरत असलेल्या कार्यकारिणीविरुध्द अपील दाखल करता येत नाही, असे आदेशात म्हटले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशामध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या दिशा-निर्देशाचे सहकार विभाग पालन करीत आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरातील अनेक को. ऑप. हौसिंग सोसायटीमधील एक-दोन सभासदांच्या तक्रारीनंतर सहकार विभागाचे अधिकारी कार्यकारिणी बरखास्त करण्याकरीता अपील दाखल करून कारवाई करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा को. ऑप. हौसिंग सोसायटीच्या कार्यकारिणीस सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांकडून विनाकारण देण्यात येणाऱ्या त्रासापासून मुक्त करण्याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-१२-२०१७) :** (१) होय.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८३ मधील सद्याच्या तरतूदीनुसार निबंधकास स्वतःहून किंवा संस्थेंच्या १/५ सदस्यांनी केलेल्या अर्जावरुन किंवा कलम ८१ च्या पोटकलम ५(ब) तिसऱ्या परंतुकान्वये विशेष अहवालाच्या आधारे स्वत: किंवा याबाबत लेखा प्राधिकृत केलेल्या व्यक्तिकडून संस्थेची रचना, तिचे कामकाज व तिची आर्थिक स्थिती यांची चौकशी करता येईल. सदर तरतूदींचे पालन निबंधकांमार्फत करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) लागू नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सोयाबीनचे अनुदान देणेबाबत

**(५०) ९४८०७ (२३-०८-२०१७). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात गतवर्षी पाऊस चांगला झाल्यामुळे सोयाबीनचे विक्रमी उत्पादन झाल्याने भाव कमी झाले परिणामी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत सुरु करण्यात आलेल्या शेतीमाल कर्ज योजनेअंतर्गत २९७ शेतकऱ्यांनी ६ महिन्यासाठी २०७५१ क्विंटल सोयाबीन तारण ठेवून ४ कोटी रु. कर्ज ६ महिन्याच्या मुदतीने देवून त्यानंतर शेतक-यांनी सदर माल परत घेऊन जाणे अथवा न नेल्यास २ % अतिरिक्त व्याज लागेल अश्या नोटीस देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील सर्व कृषी बाजार समितीमध्ये १०,१७,४७१ क्विंटल सोयाबीन खरेदी करण्यात आले असून सोयाबीनचे भाव कमी झाल्याने शासनाने प्रती क्विंटल २०० रु अनुदान जाहीर केल्याने त्यासाठी शेतक-यांकडून प्रस्ताव मागितले असता जिल्ह्यातील ६०९५१ शेतकऱ्यांचे १९ कोटी १२ लाख २० हजार ८७ अनुदानाचे प्रस्ताव दाखल झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१६ या काळात बाजार समितीने खरेदी केलेल्या सोयाबीनचे अनुदान अद्यापी शेतकऱ्यांना मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून शेतकऱ्यांना सोयाबीनचे अनुदान देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-११-२०१७) :** (१) होय.

(२) हे खरे आहे. मात्र,लातूर जिल्ह्यातील पात्र ५८,४७८ शेतकऱ्यांना रुपये १९,३९,३०४ अनुदान देय आहे.

(३) व (४) शासन निर्णय दिनांक २६/१०/२०१७ अन्वये राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये २००/- प्रमाणे अनुदान देण्यासाठी रुपये १०८,६४,२९,०००/- इतकी रक्कम आकस्मितता निधीतून उपलब्ध करुन वितरीत करण्यात आली असून, शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.